# प्रेसनोट

नाशिक,
दि. १०/०४/२०२४

**आलोसे रविंद्र बळीराम दहीते, अव्वल कारकुन, धान्य वितरण अधिकारी कार्यालय मालेगाव, जि.नाशिक यांनी २२०००/- रुपये लाचेची रक्कम स्विकारल्याने त्यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध कायद्यान्वये कारवाई केले बाबत.**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक |
| गुन्हा नोंद क्रमांक | मालेगाव कॅम्प पोलीस स्टेशन नाशिक ग्रामिण गु.र.नं. ८३/२०२४ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ प्रमाणे. |
| आरोपीचे नाव व कार्यालय | रविंद्र बळीराम दहीते, अव्वल कारकुन धान्य वितरण अधिकारी कार्यालय मालेगाव, जि. नाशिक |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | २२,५००/-रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | २२,०००/-रुपये |
| थोडक्यात माहिति | यातील तक्रारदार हे सामाजिक कार्य करत असुन यातील आलोसे रविंद्र बळीराम दहीते, अव्वल कारकुन धान्य वितरण अधिकारी कार्यालय मालेगाव, जि.नाशिक यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांनी दि. ०४/०४/२०२४ रोजी मालेगाव शहर परीसरातील दिलेल्या १५ गरीब व गरजु कुटंबांचे अंत्योदय योजना व पिवळे रेशनकार्ड ची रेशन मिळणेकरीता ऑनलाईन नोंदणी करून देण्याचे मोबदल्यात १५००/- रू प्रत्येकी याप्रमाणे एकूण २२,५००/- रूपयांची लाचेची मागणी केल्याने तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक कार्यालयात तक्रार दिली.<br>सदर तक्रारीवरुन ला.प्र.वि. नाशिक पथकाने पडताळणी करून सापळा आयोजित केला असता सापळा कारवाई दरम्यान आलोसे रविंद्र बळीराम दहीते, अव्वल कारकुन धान्य वितरण अधिकारी कार्यालय मालेगाव, जि.नाशिक यांनी तक्रारदार यांचे कडे २२५००/- रुपये लाचेची मागणी करून दि.०८.०४.२०२४ रोजी मागणी केलेल्या लाच रक्कमेपैकी २२,०००/- लाचेची रक्कम स्विकारल्याने त्यांना पकडण्यात आले असुन त्यांचेविरूध्द मालेगाव कॅम्प पोलीस स्टेशन नाशिक ग्रामिण गु.र.नं. ८३/२०२४ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ प्रमाणे. दि.०९.०४.२०२४ रोजी गुन्हा नोंदविण्यात आला आहे. |

लाचलुचपत विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्र, नाशिक येथे संपर्क करावा.


संपर्क पत्ता :- ला.प्र.वि. नाशिक परिक्षेत्र, नाशिक
संकेतस्थळ :- acbmaharashtra.gov.in
ई-मेल :- spacbnashik@mahapolice.gov.in
ऑनलाईन तक्रार :- acbmaharashtra.net
टोल फ्री क्रमांक :- १०६४
दुरध्वनी क्रमांक :- ०२५३-२५७५६२८, २५७८२३०
व्हॉट्स ॲपक्र :- ९९३०९९७७००


पोलीस उपअधीक्षक/पोलीस अधिक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो * नाशिक परिक्षेत्र, नाशिक

(नरेंद्र भा. पवार)
पोलीस उपअधीक्षक (वाचक)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्र, नाशिक

Scanned with CamScanner